# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ठाणे – 401101

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | :- | मिरा-भाईंदर शहरातील दर्शनिय भागावर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणे. |
| अंदाजित खर्च | :- | रु. 99,21,782/-<br>(रु. नव्यान्नव लाख एकवीस हजार सातशे ब्याऐंशी मात्र) |
| निविदा फॉर्म फी | :- | रु. 19000+3420 (GST) = 22420/-<br>(रु. बावीस हजार चारशे वीस मात्र) (ना- परतावा ) |
| निविदा बयाणा रक्कम | :- | Rs. 1,90,000/- (रु. एक लाख नव्वद हजार मात्र) |
| निविदा पत्रके विक्री व स्विकारण्याची अंतिम तारीख | :- | दि. 11 /02/2026 ते दि.25/02/2026 दुपारी 1.00 पर्यंत. |
| ऑनलाई निविदा उघडण्याची तारीख | :- | दि. 27/02/2026 दुपारी 1.00 पर्यंत. |

उपायुक्त (घ.क.व्य.)

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. - ठाणे

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## निविदा पत्रक - 2026

<u>तांत्रिक पात्रता निकष :-</u>

निविदेत पात्र होण्यासाठी निविदाकाराने खालील कागदपत्रे ऑनालाईन पध्दतीने सादर करावीत. तांत्रिक पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदा अटीशर्ती | निविदाधारकाने सादर करावयाची कागदपत्रे | सोबत जोडले आहे/ नाही |
|---|---|---|---|
| 1. | निविदेची फी (Tender Form Fee) | निविदा फी भरल्याची ऑनलाईन पावती (Receipt) | |
| 2. | बयाणा रक्कम – (Earnest Money Deposit) (EMD) | बयाणा रक्कम (EMD) भरल्याची ऑनलाईन पावती. | |
| 3. | वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) | वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत | |
| 4. | पॅनकार्ड प्रत | पॅनकार्डची प्रत | |
| 5. | निविदाधारकांचे (Bidder) कंपनी/ भागीदारी संस्था प्रोपायटरी फर्म्सचे संबंधित सस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र | कंपनी / संस्था/ फर्मच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. | |
| 6. | <u>सरासरी वार्षिक उलाढाल :-</u> निविदाकाराची मागील 3 आर्थिक वर्षाची (2022-23, 2023-24, 2024-25) सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान 75% असावी. (याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे. | CA ने प्रमाणित केलेले वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) | |
| 7. | <u>अनुभव</u>– निविदाकाराने मागील 3 आर्थिक वर्षात (2022-23, 2023-24, 2024-25) शासकीय/ निम | शासकीय / निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेले अनुभव प्रमाणपत्र किंवा Work Completion Certificate | |

उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

| अ.क्र. | निविदा अटीशर्ती | निविदाधारकाने सादर करावयाची कागदपत्रे | सोबत जोडले आहे/ नाही |
|---|---|---|---|
| | शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये खालीलप्रमाणे काम केलेले असणे आवश्यक आहे. (अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यादेश चालणार नाही.)<br>i) निविदा किंमतीच्या 80% चे एक काम किंवा<br>ii) निविदा किंमतीच्या 50% ची दोन कामे किंवा<br>iii) निविदा किमतीच्या 40% ची तीन कामे | (अनुभव प्रमाणपत्र व Work Completion certificate मध्ये रक्कम नमुद असणे आवश्यक आहे.) | |
| 8. | निविदा सादर करे पर्यंत निविदाकार इतर कोणत्याही सरकारी/ निम शासकीय/ महामंडळात काळ्या यादीत टाकले जाणार नाही. बोलीदार संस्था एक हमीपत्र अपलोड करेल. | काळ्या यादीत न टाकल्याबाबत निविदाकाराने जाहीर पत्र सादर करणे (स्कॅन प्रत) | |
| 9. | निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र | खोटी कागदपत्रे सादर न केल्याबाबत निविदाकाराने रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे (स्कॅन कॉपी) | |

<u>अटीशर्ती :-</u>

1. महानगरपालिकेस प्राप्त सर्व अथवा कोणत्याही निविदा अंशत: किंवा पुर्णपणे कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मिरा भाईंदर महानगरपालिका राखुन ठेवीत आहे.
2. निविदा भरताना निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम https:\\mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑन लाईन रिसिप्ट सिस्टीमद्वारे भरणा करण्यात यावी. अन्यथा निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.
3. निविदाधारकाराने सादर केलेल्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये (Technical Bid) आवश्यक ती कागदपत्रे असल्यास (Financial Bid) उघडण्यात येईल.
4. निविदाकाराच्या प्रत्येक देयकातून 2% सुरक्षा अनामत, आयकर व इतर कर नियमानुसार कपात करण्यात येईल.
5. निविदाकाराची अतिरिक्त सुरक्षा अनामत 2% रक्कम बँक गॅरंटी/ डि.डी. स्वरुपात स्विकृत पत्र दिल्यानंतर भरणा करणे.
6. निविदेसोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही. तसेच मालाचे / साहित्याचे पुरवठ्याबाबतचे कोणतीही आगाऊ रक्कम महानगरपालिकेकडून पुरवठादाराला दिली जाणार नाही.
7. निविदा भरताना प्रत्येक बाबीचे दर सर्व कर (उदा. GST, किंवा निविदा भरताना लागू असलेले इतर कर इ.) धरुनच व इतर खर्च (उदा. हमाली, वाहतुक, पॅकिंग इ.) यासह भरण्यात यावे.

उपायुक्त (भ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

8. मंजुर निविदाकारास शासन निर्णयानुसार रुपये 5.00 लक्षापर्यंत रुपये 500/- व त्यापुढील रक्कमेवर 0.3 टक्के इतकी रक्कम मुद्रांक शुल्क भरणा करुन चलन सादर करणे आवश्यक आहे.
9. निविदाधारक यांनी करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानंतर तात्काळ ठरवून दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत भिंती रंगविण्याचे करणे बंधनकारक राहील.
10. निविदाधारकाने भिंती रंगविणे बाबतचे दर नमुद करताना ऐक्रेलिक पेंट साहित्य सहित व इतर सर्व करासहीत नमुद करावे.
11. निविदाधारकाने भिंती रंगविणे कामाचे गुणवत्ता, दर्जा, परिमाण याबाबत तक्रारी असल्यास त्याबाबत महानगरपालिकेची तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे कामे पुनश्च करून देणे बंधनकारक राहील पुनश्च केलेल्या कामाचे कोणत्याही प्रकारे मोबादला दिला जाणार नाही.
12. महानगरपालिकेने नेमुन दिलेल्या ठिकाणी निविदाधारकाने भिंती रंगविणे कामे मुदतीत करणे आवश्यक आहे.
13. मंजुर निविदाकाराने महानगरपालिकेने दिलेल्या Design मध्ये भिंती रंगविने बंधनकारक आहे.
14. निविदाधारकाने महानगरपालिकेने दिलेल्या चित्रानुसार/ सुशोभिकरण/ संदेशानुसार भिंती रंगविणे कामे चांगल्या प्रतीच्या रंगाने भिंती रंगविणे बंधणकारक राहील तसेच निविदाधारकाने केलेल्या कामाचे Geo Tag फोटो देणे बंधनकारक राहील. तसेच दैनंदिन केलेल्या भिंती रंगविने कामाच्या चलन व अहवाल यांच्यावर संबधित स्वच्छता निरीक्षक यांच्या प्रमाणित करून घेणेबंधनकारक राहील.
15. महानगरपालिकेने मागणी केल्याप्रमाणे निविदाधारकाने भिंती रंगविणे कामे विहीत मुदतीत न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही निविदाधारकाकडून भिंती रंगविणे कामी ज्यादा होणारा खर्च निविदा इसारा रक्कमेमधून व अन्य कायदेशीर मार्गाने वसुल केला जाईल.
16. निविदाधारकाने भिंती रंगविणे कामे मध्येच खंडीत केलक अथवा अटीशर्तीचा भंग केल्यास तक्रार आल्यास निविदाधारकाची इसारा रक्कम जप्त करुन त्यांची निविदा रद्द करण्यात येईल अथवा काळया यादीत नाव टाकण्यात येईल.
17. निविदेतील मधील सर्व अटीशर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.
18. कामापोटी अथवा मटेरिअलवर कोणत्याही प्रकारची ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.
19. महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या ठिकाणापेक्षा जादाचे कामे झाल्यास निविदा मंजुर दरात करणे बंधनकारक असेल.
20. नैसर्गिक आपत्ती उदा. आग, पुर, वादळ, वीज पडणे, भुकंप, ज्वालामुखी तसेच अपघात यामुळे व संप. संचारबंदी, टाळेबंदी यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महानगरपालिका जबाबदार असणार नाही, कुठलीही भरपाई मिळणार नाही.
21. निविदेतील अटीशर्तीमध्ये कोणत्याही वेळी बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपायुक्त (घ.व्यं.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

22. कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्यास कनिष्ठ व जिल्हा मा. न्यायालय ठाणे व उच्च मा. न्यायालय मुंबई उच्च हे क्षेत्र कायदेशिर दाव्यासाठी बंधनकारक राहील.
23. सर्व शासकीय विविध कर भरण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.
24. कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.
25. सदर निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याच्या अधिकार महानगरपालिकेस असेल.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर पश्चिम,
ता. जि. ठाणे 401 101

## सन 2026

## आर्थिक लिफाफा (Financial Bid)

कामाचे नाव :- मिरा-भाईंदर शहरातील दर्शनिय भागावर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणे.

| Sr.No. | Description of item | Rate (All Taxes) |
|---|---|---|
| 1 | **Digital wall painting / 3D painting** Exterior primer and acrylic paint then painting the wall with Digital painting / 3D painting work for various theme. | Per Sq. Mt |
| 2 | **Wall painting / slogan painting** Scraping cleaning applying exterior acrylic paint for background with writing the slogan | Per Sq. Mt |

निविदाकाराची स्वाक्षरी

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
उप-आयुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (प)

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असुन त्या संबधीची सर्व माहिती समजावुन घेतली आहे. निविदेसंबधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

वरील निविदांचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक व मान्य आहेत.

दिनांक :-

निविदाधारकाची सही

शिक्का

नाव :- ____________________

संपुर्ण पत्ता :- ____________________
____________________
____________________
____________________
____________________